REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# सावरकरांचे व्यक्तित्व व त्यांचे साहित्य

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय,
मौदा जि. नागपूर.

## प्रस्तावना :



नाशिक जिल्ह्यातील भगुर या गावी 28 मे 1883 ला दामोदर व राधा सावरकर यांना पुत्ररत्न झाले. त्याचे नाव विनायक ठेवण्यात आले. दामोदर सावरकरांना बाबाराव, विनायक व नारायण अशी तीन अपत्ये होती. विनायक नऊ वर्षाचा असतांना त्यांची आई (1892) वडील 1899 ला स्वर्गवासी झाले. विनायक दामोदर सावरकरांना लहाणपणापासून साहित्याची आवड होती. त्यांनी वयाच्या 13 व्या वर्षी स्वदेशीचा फटका व स्वतंत्रतेचे स्रोत या रचना केल्या. त्यांचा 1901 मध्ये यमुनाबाईशी विवाह झाला. विनायक सावरकर कार्यकर्तृत्वामुळे स्वातंत्रवीर सावरकर म्हणून परिचित आहेत. सावरकरांनी कादंबऱ्या, आत्मचरित्र, नाटके, लेखसंग्रह, ग्रंथ अशा स्वरूपाचे लेखन केले. त्यांचे माझी जन्मठेप हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

## सावरकरांचे व्यक्तिमत्व :

सावरकरांच्या व्यक्तिमत्वामध्ये विज्ञाननिष्ठा व स्वातंत्र्यनिष्ठा अशा मुलभूत जीवन निष्ठा दिसून येतात. सावरकरांना क्रांतीवीर म्हणतात याचे कारण असे की स्वातंत्र्यवीर हे क्रांतीची भाषा बोलणारे बोलघेवडे देशभक्त नव्हते तर लहानपणापासून मनामध्ये देशभक्तीची भावना घेवून जगत होते. आपल्या देशाला परकियांच्या गुलामगिरीतून सोडविण्यासाठी 'मारिता मारिता मरेन' अशी भूमिका त्यांची होती. इंग्रजाना भारतातून परतावून लावण्यासाठी बंदुका, बॉम्ब सारख्या शस्त्राचा वापर करणे त्यांना गैर वाटत नव्हते. 'रणाविना स्वातंत्र्य कुणा मिळाले?' असा त्यांचा शांततेचा बुरखा पांघरणाऱ्याना प्रश्न होता. इंग्रज जर स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भारतीयांना आतंकवादी, अराजकवादी मानत असतील तर त्यांच्याविरूद्ध शस्त्र हातात घ्यायला भारतीयांना संकोच वाटता कामा नये, अशी त्यांची भूमिका होती.

इंद्रधनुष्यातील प्रत्येक रंग आपल्या सामर्थ्याने उजळून काढतो त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू इंद्रधनुष्यातील रंगाप्रमाणे आहेत. हिरा कोळशाच्या खाणीत असला तरी चकाकतो त्याचप्रमाणे सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध गुण व्यक्त होतात. सावरकर अत्यंत प्रतिभावान होते. अ.ना. देशपांडे म्हणतात– ''लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा शब्दरूप आविष्कार म्हणजे त्याचे वाङ्मय', अशी जर वाङ्मयाची व्याख्या केली तर त्या व्याख्येच्या कसोटीला सावरकरांचे वाङ्मय लेखन पुरेपूर उतरण्यासारखे आहे.''1 कोणत्याही थोर महापुरुषाचे व्यक्तिमत्व संमिश्र स्वरूपाचे असते. त्यामध्ये विविध विचार, कल्पना, ध्येयशक्ती, अशा उभ्या आडव्या तंतुची विण होती म्हणून सावरकराचे व्यक्तिमत्व साहित्यिकांना जटील व संमिश्र वाटते.

## निसर्गनिष्ठता :

निसर्गाच्या नियमाप्रमाणे जो शक्तीशाली असेल तो जगतो व कमजोर असेल त्याची शिकार केली जाते. त्याचप्रमाणे 'जीवनकलहात श्रेष्ठतम असतो तोच जगतो हा निष्ठुर नियम खोदलेली ती निसर्गाची तलवार कितीही

झाकली तरी तिची जीवघेणी धार आणि त्या निसर्गाची ती Red in tooth and claw असणारी वाघनखं ही काही बोथट होत नाहीत.'2

व्याघ्र – नक्र– सर्प–सिंह–हिंस्त्र–जीव संगरी ।
शस्त्रशक्तिने मनुष्य हा जगे धरेवरी ।।

अशा शस्त्रगीतातून त्यांनी सृष्टिमध्ये दुर्बलांना गुलामाप्रमाणे रहावे लागते तर सबल हे स्वाभिमानाने जगतात. भारतीय जनतेला स्वाभिमानाने जगायचे असेल तर इंग्रजाच्या गुलामगिरीतून कोणत्याही मार्गाने बाहेर पडण्याशिवाय तरणोपाय नाही, असे सांगितले आहे.

**देशभक्ती :**

सावरकरांच्या संपूर्ण साहित्यातून देशभक्तीची विविध उदाहरणे पाहायला मिळतील. आपण करीत असलेले कार्य हे परमेश्वराचेच कार्य आहे. पारतंत्र्यात असलेल्या जनतेला स्वातंत्र्य मिळवून देणे हे खऱ्या देशभक्ताचे कार्य होय. आपल्या धार्मिक ग्रंथामध्येही संकटामध्ये असणाऱ्यांना प्रत्यक्ष परमेश्वराने अवतार धारण करून स्वतंत्र केले आहे, यादवांच्या राज्यात श्रीकृष्ण, रावणांवर विजय मिळविणारे राम ही सत्याच्या बाजूने उभी असलेली उदाहरणे आहेत. 'भागवतधर्मातील संतानी जे देवासाठी केले ते सावरकरांनी 'देशा'साठी केले' असे व.दि. कुळकर्णी यांनी म्हटले आहे.

हन्ता रावण का है, अपना राम वीर वर सेनानी,
कर्मयोग का देव है, स्वयं कृष्ण सारथी अभिमानी ।
भारत तेरे रथको सेना कौन रोकणेवाली है?
फिर देर क्यो, उठो भाई, हम ही हमारे वाली है।

देशाला स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर आपण इंग्रजांच्या दयेवर अवलंबून राहता कामा नये. त्यासाठी पूर्ण शक्तीने परकीय शक्तीशी मुकाबला केला पाहिजे व वेळ प्रसंगी बलिदानाची वेळ आली तरी मागे न हटता ताठ मानेने पुढे गेले पाहिजे. परदेशी मालाची होळी करणे, कारागृहातच बंदिवानामध्ये राष्ट्रभक्ती जागृत करणे, अशा कार्यातून सावरकरांची राष्ट्रनिष्ठा दिसून येते.

**मानवतावादी :**

'ज्यात सर्व मनुष्यजातीचा समावेश होईल व जेथील स्त्री पुरुषानी ही पृथ्वी, ही भूमी, हा प्रकाश ही खरी मनुष्याची पितृभूमी व मातृभूमी आहेत. यांच्यापासून मिळणाऱ्या लाभाचा प्रयत्न करायचा आणि त्यांचा उपभोग घ्यायचा समान अधिकार राहील, असे संपूर्ण जगाचे एक राष्ट्र करणे.' 3 यातून सावरकरांची मानवतावादी व विश्वराष्ट्रवादी भूमिका दिसून येते. नैसर्गिक बाबींचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य कुणीच नाकारू शकत नाही, असे वाटत होते.

**भावनात्मकता :**

सावरकरांच्या साहित्यातून व भावनात्मकता दिसून येते.

'ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा, प्राण तळमळला'

या काव्यातून त्यांची भावनात्मकता व्यक्त होते. सावरकरांच्या मनामध्ये राष्ट्रभावना ओतप्रोत भरून असलेल्यामुळे कुणीही हिंदूधर्म, हिंदुराष्ट्र यांच्या विरोधामध्ये बोलत असतील तर त्यांच्याविरूद्ध अत्यंत कठोरपणे टिका करतात. सावरकरांना आपल्या राष्ट्रातील हिंदू परंपरेचा त्यांना सार्थ अभिमान होता. रामायण, महाभारत, भारताचा तेजस्वी इतिहास याबद्दल आदर त्यांच्या ग्रंथातून व्यक्त होतो. '1857 चे स्वातंत्र्यसमर'मध्ये सावरकरांनी राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, छत्रपती संभाजी महाराज, नाना फडणवीस, पेशवा बाजीराव, चाफेकर बंधु यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली आहे. ही सावरकरांना बंडाची प्रेरकस्थाने त्यांना वाटतात.



LBP PUBLICATION

**सावरकरांचे साहित्य :**

आत्मचरित्र– (1) माझी जन्मठेप, (2) शत्रुच्या शिबिरात
कादंबऱ्या– (1) काळे पाणी (2) मोपल्याचे बंड
निबंध – (1) विज्ञाननिष्ठ निबंध 1,2 (2) जात्युच्छेदक निबंध
ऐतिहासिक ग्रंथ– (1) जोसेफ मॅझिनी (2) हिंदुपादशाही (3) 1857 चे स्वातंत्र समर, (4) सहा सोनेरी पाने
नाटके – (1) संगीत उःशाप, (2) संन्यस्त खडग (3) उत्तरक्रिया
काव्ये – (1) कमला (2) गोमंतक (3) सप्तर्षी (4) महासागर (5) विरोच्छवास (6) अन्य स्फुट कविता तसेच सावरकरांचे लेखकसंग्रह, निवेदने, भाषणे, प्रसिद्ध आहेत.

कोणत्याही लेखकाच्या जीवनातील विविध पैलू त्यांच्या साहित्यातून येत असतात. सावरकरांनी तर साहित्याच्या सर्वक्षेत्रात मुक्तपणे विहार केला आहे. त्यांनी निबंध, कादंबरी, चरित्र, इतिहास, काव्य, नाटक अशा सर्व क्षेत्रात आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटविला आहे. त्यांचे साहित्य अभ्यासल्यानंतर असे वाटते की स्वातंत्र्यवीर सावरकर हे राजकारणापेक्षा साहित्याच्या क्षेत्रात कुठेही कमी पडतांना दिसत नाहीत. वक्तृत्वाच्या क्षेत्रात तर त्यांचा हातखंडा होता. योग्य डावपेचाद्वारे प्रतिस्पर्धाला खिंडीत पकडून त्याला नामोहरण करीत होते. तीच शैली त्यांच्या वामयातूनही व्यक्त होते. थंड झोपलेल्या व्यक्तीमध्येही चैतन्य निर्माण करू शकण्याची ताकद सावरकरांच्या साहित्यात आहे. सावरकरांचे साहित्य वाचल्यानंतर शांत प्रवृत्तीचा वाचकही क्रांतीची भाषा केल्याशिवाय राहणार नाही अशी शक्ती सावरकरांच्या साहित्यातून व्यक्त होते.

**चरित्रकार :**

सावरकरांनी आपल्या साहित्यातून इतिहासातील कितीतरी महान नायकाचे चरित्र मांडलेले आहेत. हुबेहुब व्यक्तिचित्रण करण्याची क्षमता असणाऱ्या सावरकरांनी 'माझी जन्मठेप', 'शत्रुच्या शिबिरात', 'पूर्वपीठीका' अशा आत्मचरित्रात्मक लेखनातून आपली भूमिका विशद केली आहे. आपल्या पश्चात पुढील पिढीला प्रेरणादायक ठरतील असे विचार त्यांच्या आत्मचरित्रात्मक लेखनातून व्यक्त झाले आहेत. 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रातून सावरकरांच्या अज्ञात कृत्याची, त्यागाची, बलिदानाची स्थळे आपणाला समजतात, त्यात 24 फेब्रु. 1911 ते 6 जाने. 1924 या कालावधीमध्ये सावरकरांनी अंदमानामध्ये सोसलेल्या हालअपोतून देशभक्ताना प्रेरणा मिळते. तसेच सावरकरांची देशभक्तीही व्यक्त होते. सावरकर हे राष्ट्रनिष्ठा असलेले क्रांतिकारक कसे होते हे स्पष्ट होते.

**इतिहासकार :**

'57 चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचे 1857 चे स्वातंत्र्यसमर असे नामकरण करण्यात आले. या ग्रंथाला मुद्रणपूर्व बंदी आली होती. हा भारतीय क्रांतिकारकांना स्फूर्ती देणारा महान ग्रंथ आहे. तसेच सावरकरांनी सहा सोनेरी पाने, हिंदू पदपादशाही, नेपाळी आंदोलनाचा इतिहास असे ऐतिहासिक दस्ताऐवज लिहिलेले आहेत. इतिहासाचे वर्णन त्यांनी भावनात्मक न करता बुद्धिनिष्ठ भूमिकेतून केले आहे. या ग्रंथातून समीक्षक सावरकर आपल्याला दिसून येतात.

**कलावंतवृत्ती :**

'मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे पण परिस्थितीने मला राजकारणी बनविले आहे' हे सावरकरांचे उद्‌गार त्यांच्या काव्यप्रतिभेतून स्पष्ट होतात. कितीतरी ठिकाणी त्यांची भाषा संस्कृत शब्दाचा वापर केल्यामुळे दुर्बोध, क्लिष्ट स्वरूपाची वाटते. पण त्यांनी आशयाला महत्त्व दिले आहे. त्यांची कविता स्वतंत्रतेचा ध्यास घेतलेली आहे. त्यामध्ये जशी उत्तुंग कल्पनाशक्ती आहे तसेच ती क्रांतीकाराचा विद्रोह स्वातंत्र्याकडे कसा जाणारा आहे हेही स्पष्ट करते.

नभि नक्षत्रे बहुत, एक परि प्यारा
मज मातृभूमिचा तारा

हा तारा (स्वातंत्र्य) मिळविण्यासाठी या कलावंताने सर्व आयुधांचा वापर केला आहे. लघुनिबंध, निबंध, काव्य, पत्र या सर्वांमधून राष्ट्रभावना व कवी वृत्ती दिसते.

संतान या भारतभूमिस तीस कोटी
ते मातृभक्तिरत सज्जन धन्य होती
हे आपुले कुलहि त्यामधि ईश्वरांश
निर्वंश होवूनि ठरेल अखंड वंश

कुटुंबाला सहानुभूती व्यक्त करतांनाही त्याची देशभक्ती त्याच्या काव्यातून दिसून येते. सावरकर कवी आहेत तसेच नाटककारही आहेत. त्यांनी उःशाप, संन्यस्त खड्ग, उत्तरक्रिया ही नाटके लिहिली. त्यांनी आपल्या नाटकातून सनातनी ढोंगी प्रवृत्तीवर आसूड ओढले. 'संन्यस्त खडग'मध्ये अहिंसावादी प्रवृत्तीवर टिका आहे. सावरकरांनी निबंधामधून जातीभेद, धर्मभोळ्या प्रवृत्ती, यांचा धिक्कार केला. त्यांच्या निबंधाचा 'हिंदुत्व' केंद्रबिंदू आहे. विरोधकांच्या कृतीचा धिक्कार करून स्वातंत्र्यप्रेमी कृतीसाठी आवाहन आहे.

## समाजसुधारक :

'जातीनिर्मूलनासाठी समाजातील असणाऱ्या विविध प्रथा, चालीरिती नष्ट करणे आवश्यक वाटत होते. मानवीबुद्धीचा विकास, होण्यासाठी जातीयवादाच्या चौकटीतून बाहेर यायला पाहिजे. तेव्हाच सबळ हिंदुराष्ट्र निर्माण होईल' असे त्यांना वाटत होते.

एकूण स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना 'डॉ. के.ना. वाटवे यांनी 'गजेंद्र कमल विनायक', श्री. बाळशास्त्री हरिदास यांनी 'आधुनिक भारतातील व्यास' तर श्री. ग.त्र्यं. माडखोलकर यांनी 'महाराष्ट्रातील एक एक पुरुषार्थी कवी' या शब्दात गौरव केला आहे. स्वातंत्र्यासाठी आयुष्य झिजविणाऱ्या या थोर क्रांतिकारकास मानाचा मुजरा!

## टीपा :

1) गावडे प्र.ल.— विनायक दामोदर सावरकर — 'एक चिकित्सक अभ्यास', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, (प्रथमावृत्ती) 1970 — पृ. क्र. 8
2) फडके यशवंत दिनकर — 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची शस्त्रास्त्रांच्या वापराबद्दलची भूमिका', संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे 7 (1989) — पृष्ठ क्र. 12
3) गावडे प्र.ल.— विनायक दामोदर सावरकर — 'एक चिकित्सक अभ्यास', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, (प्रथमावृत्ती) 1970 — पृ. क्र. 11

## संदर्भ ग्रंथ :—

1) सावरकर विनायक दामोदर — '1857 चे स्वातंत्र्यसमर' 'रिया पब्लिकेशन, 250, ब—30, शीतल बंगला, नागालापाई, कोल्हापूर (सप्टें. 2012) मूल्य रू. 100/—
2) गावडे प्र.ल.— विनायक दामोदर सावरकर— एक चिकित्सक अभ्यास'— स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे 1970
3) कुळकर्णी व. दि. 'स्वातंत्र्यवीर सावरकर — एक चिंतन', पद्मगंधा प्रकाशन, 36/11, धन्वंतरी सह. गृहरचना संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन पुणे (2004) (मूल्य 60/—)



प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, मौदा जि. नागपूर.